12-12-2014 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A-1
SGJ/ 11:00

**(सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक पॅकेज न मिळाल्याबाबत**

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, दुष्काळाच्या प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देताना सरकारच्या वतीने कापूस उत्पादक, सोयाबीन उत्पादक, धान उत्पादक शेतकऱ्यांना काल कोणत्याही प्रकारचे आर्थिक पॅकेज देण्यात आलेले नाही. या संदर्भात आम्ही म.वि.प. नियम 93 अन्वये प्रश्नोत्तराचा तास स्थगित करण्याबाबत सूचना दिलेली आहे. शेतकऱ्यांना जोपर्यंत आर्थिक मदत मिळण्याबाबतची घोषणा सरकारकडून होत नाही तोपर्यंत आम्ही सभागृहाचे कामकाज चालू देणार नाही.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, त्यांनी कृपया आपापल्या जागेवर जाऊन बसावे. आता प्रश्नोत्तराच्या तासाला सुरुवात होईल.

------

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**:तोंडी उत्तरे

**सभापती** : तारांकित प्रश्न क्रमांक 1376. सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप,सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी प्रश्न पुकारावा.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतच असतात.)

अशा गोंधळाच्या परिस्थितीत मला सभागृहाचे कामकाज करणे शक्य नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक 20 मिनिटांसाठी स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक सकाळी 11.03 वाजता 20 मिनिटांसाठी स्थगित झाली.)

---------

नंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगितीनंतर )**

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.रामनाथ मोते )**

( विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात. )

**तालिका सभापती (श्री.रामनाथ मोते)** : अशा गोंधळाच्या परिस्थितीमध्ये मला सभागृहाचे कामकाज चालविणे शक्य नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक 11.45 वाजेपर्यंत स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक सकाळी 11.23 ते 11.45 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

यानंतर श्री.बोर्डे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.रामनाथ मोते)**

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य पीठासीन अधिकाऱ्यांच्या आसनासमोर येऊन घोषणा देतात.)

**तालिका सभापती (श्री.रामनाथ मोते)** : माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी कृपया आपापल्या जागेवर जाऊन बसावे.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य पीठासीन अधिकाऱ्यांच्या आसनासमोर घोषणा देतच असतात.)

मी पुन्हा एकदा सांगतो की, सन्माननीय सदस्यांनी कृपया आपापल्या जागेवर जाऊन बसावे. तारांकित प्रश्न क्रमांक-177. सन्माननीय सदस्य श्री.नरेंद्र पाटील.

(तारांकित प्रश्न उपस्थित करण्यात आला नाही.)

**तालिका सभापती** : तारांकित प्रश्न क्रमांक-1329.

(तारांकित प्रश्न उपस्थित करण्यात आला नाही.)

मी सन्माननीय सदस्यांना पुनश्च सांगतो की, त्यांनी कृपया आपापल्या जागेवर जाऊन बसावे. मी आपले म्हणणे ऐकून घेतो.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन पीठासीन अधिकाऱ्यांच्या आसनासमोर घोषणा देत असतात.)

**तालिका सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण आपल्या जागेवर जाऊन बसावे. मी आपले म्हणणे ऐकण्यास तयार आहे. आपण आपले म्हणणे मांडावे.

(गोंधळ)

सन्माननीय सदस्य श्री. सुनील तटकरे यांनी आपले म्हणणे मांडावे.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, दुष्काळाच्या विषयावर गेली 2 दिवस चर्चा झाली. शासनाने त्या संदर्भात निवदेन केले. ऊस, धान, कापूस उत्पादक शेतकऱ्यांचे प्रचंड प्रमाणावर नुकसान झाले आहे. फळबागांचे नुकसान झाले आहे.

(गोंधळ)

**तालिका सभापती** : सभागृहात निर्माण झालेल्या गोंधळाच्या परिस्थितीत सभागृहाचे कामकाज चालविणे शक्य नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक 5 मिनिटांसाठी स्थगित करतो.

(सभागृहाची बैठक सकाळी 11 वाजून 51 मिनिटांनी 5 मिनिटांसाठी स्थगित झाली.)

----

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. रामनाथ मोते)**

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन पीठासीन अधिकाऱ्यांच्या आसनासमोर घोषणा देत असतात.)

**तालिका सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण आपल्या जागेवर जाऊन बसावे. मी आपले म्हणणे ऐकण्यास तयार आहे. (गोंधळ) मी पुन्हा एकदा सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण आपल्या जागेवर जाऊन बसावे. (गोंधळ)

सभागृहात निर्माण झालेल्या गोंधळाच्या परिस्थितीत सभागृहाचे कामकाज चालविणे शक्य नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक दुपारी 12.20 वाजेपर्यंत स्थगित करतो.

(सभागृहाची बैठक दुपारी 11 वाजून 58 मिनिटांनी दुपारी 12 वाजून 20 मिनिटापर्यंत स्थगित झाली.)

----

( नंतर श्री. रोझेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री.रामनाथ मोते)**

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

श्री.एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) : सभापती महोदय, घोषित केलेल्या शेतकरी पॅकेजमध्ये आपदग्रस्तांना 3950 कोटी रुपयांची रक्कम अगोदरच दिलेली आहे. ही मदत आपण प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या ताब्यात देणार आहोत. त्यानंतर फळबागांसाठी 850 कोटी रुपयांची रक्कम दिलेली आहे. हे 850 कोटी रुपये शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करणार आहोत. 3950 कोटी रुपये आणि 850 कोटी रुपये या दोन्ही रकमा शेतकऱ्यांना देणार आहोत. मग शेतकऱ्यांना सरकारने मदत दिलेली नाही, असे विरोधी पक्ष सदस्य कसे म्हणू शकतात ? ही सर्व मदत प्रत्यक्ष शेतकऱ्यांना देणार आहोत. ही मदत आपण थेट शेतकऱ्यांना देणार आहोत.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपया आपल्या जागेवर जाऊन बसावे.

आता मी पहिली लक्षवेधी सूचना पुकारतो आहे.

---------------

...2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

**पृ. शी**. : मौजे कात्रज, जिल्हा पुणे येथील भूखंडाची दोनदा विक्री केल्याने शासनाची झ ालेली फसवणूक

**मु. शी**. : मौजे कात्रज, जिल्हा पुणे येथील भूखंडाची दोनदा विक्री केल्याने शासनाची झालेली फसवणूक यासंबंधी श्री.गुरुमुख जगवानी, वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.गुरुमुख जगवानी (जळगांव स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मौ. कात्रज, जिल्हा पुणे येथील पुणे महानगरपालिकेच्या मालकीचा सर्व्हे क्रमांक ८ (जूना सर्व्हे क्र.७अ), हिस्सा क्र.१/२/१, हा अंदाजे ८००० चौ.मी. असलेला भूखंड दिनांक ७ मार्च, २००८ रोजीच्या नोंदणीकृत करार क्रमांक २५०२/२००८ नुसार पुणे महानगरपालिकेस श्री.अली जाफरी व इतर ६४ मालकांनी हस्तांतरित विकास हक्क (TDR) च्या मोबदल्यात विकला असणे, परंतु सदर भूखंड त्याच ६४ मालकांनी श्री.अली जाफरी यांना दिनांक ६ एप्रिल, २०११ रोजीच्या नोंदणीकृत करार क्र.२९०१/२०११ अन्वये पुन्हा विकणे, ज्याअर्थी सदर भूखंड पुणे महानगरपालिकेस व श्री.जाफरी या दोघांना विकल्यामुळे फेरफार क्र.२१३४६, दिनांकित २७ जून, २००८ व फेरफार क्रमांक २४३२५ दिनांकित ९ ऑगस्ट, २०११ या मध्ये दोन वेगवेगळ्या नावांची नोंद असणे, सदर बाब गंभीर असून एकाच भूखंडाची दोनदा विक्री केल्यामुळे प्रशासनाची झालेली फसवणूक, प्रशासनाकडे वारंवार निवेदन करुन देखील कार्यवाहीस होणारे अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी शासनाने तातडीने लक्ष घालून करावयाची सखोल चौकशी व त्या अनुषंगाने संबंधितांवर करावयाची कारवाई."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...3....

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

श्री.एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) (महसूल मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

श्री.गुरुमुख जगवानी : सभापति महोदय, एक इसमें ॲड हो चुका है. इन सब के पीछे कौन माफिया है ? अली जाफरी नाम के आदमी ने एक बेवा की सरकारी जमीन पर भी कब्जा कर रखा है. इसका केस भी पुलिस स्टेशन में चल रहा है. मेरी मांग है कि इस घोटाले की सीआईडी जांच की जाए. दूध का दूध और पानी का पानी होना चाहिए. भविष्य में किसी की सरकारी जमीन हड़प नहीं होना चाहिए, ऐसा मेरा कहना है.

श्री.एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) : सभापती महोदय, या घोटाळ्याची वरिष्ठ पातळीवरुन चौकशी करु आणि यामध्ये जे दोषी आढळून येतील त्यांच्यावर कारवाई करु. त्याचप्रमाणे सन्माननीय सदस्यांनी अली जाफरी वगैरेंची नावे सांगितली आहेत. त्यांच्या बद्दल योग्य ती कारवाई करण्यात येईल.

**तालिका सभापती** : हे प्रकरण अतिशय गंभीर आहे. त्यामुळे पोलीस खात्यामार्फत चौकशी करुन त्याचा अहवाल शासनाने मागवावा.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

--------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

**पृ. शी**. : ठाणे जिल्ह्यातील काही गावात बांधकाम व्यावसायिकांनी जाहिरातीव्दारे अल्प किंमतीतील घरांचे आकर्षण दाखवून लोकांची केलेली फसवणूक

**मु. शी**. : ठाणे जिल्ह्यातील काही गावात बांधकाम व्यावसायिकांनी जाहिरातीव्दारे अल्प किंमतीतील घरांचे आकर्षण दाखवून लोकांची केलेली फसवणूक यासंबंधी श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

(लक्षवेधी सूचना मांडण्यात आली नाही.)

--------------

...6....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

**<u>शासनाने जाहीर केलेल्या पॅकेजबाबत</u>**

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, मला आपण दोन मिनिटे बोलण्याची संधी द्यावी.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपया शांतता राखावी. सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांना काही बोलावयाचे आहे.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांना काही बोलावयाचे आहे. कृपया सन्माननीय सदस्यांनी आपल्या जागेवर जाऊन बसावे.

मी सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांना बोलण्याची संधी देतो. तत्पूर्वी वेलमध्ये आलेल्या सर्व सन्माननीय सदस्यांनी आपल्या आसनावर जाऊन बसावे. मी सर्वांना सांगू इच्छितो की, मला कोणीही सूचना दिलेल्या नाहीत. सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी बोलण्यासाठी परवानगी मागितल्यामुळे मी त्यांना परवानगी दिलेली आहे.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना बोलण्याची परवानगी देण्यापूर्वी वेलमध्ये आलेल्या सन्माननीय सदस्यांना आपण त्यांच्या आसनावर जाऊन बसण्यास सांगावे.

श्री.सुनील तटकरे : आपण विरोधी पक्षात असताना असे अनेक वेळा घडले आहे. सन्माननीय सदस्य वेलमध्ये असताना विरोधी पक्षनेत्यांना किंवा गटनेत्यांना बोलण्याची परवानगी देण्यात आली आहे. सभापती महोदय, माझी आपल्याला अशी विनंती आहे की, सन्माननीय सदस्यांना वेलमध्ये बसून आपल्या भावना व्यक्त करु द्याव्यात. मी त्यांच्या वतीने बोलतो.

सभापती महोदय, हरकतीच्या मुद्याव्दारे मी आपले लक्ष याकडे वेधू इच्छितो की, दुष्काळासंदर्भातील चर्चेच्या वेळी आम्ही सर्व सन्माननीय सदस्यांनी सविस्तरपणे आमच्या भावना व्यक्त केल्या आणि त्यानंतर राज्य सरकारच्या वतीने माननीय महसूल मंत्री श्री.एकनाथराव खडसे

..7....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये बसलेले असतात.)

श्री.सुनील तटकरे...........

यांनी चर्चेला उत्तर दिले. राज्य सरकारच्या माध्यमातून शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या पॅकेजच्या संदर्भात त्यांनी माहिती दिली. त्यानंतर राईट टू रिप्लायमध्ये आम्ही दोन्ही पक्षाच्या वतीने आमच्या भावना व्यक्त केल्या होत्या.

सभापती महोदय, आमची हीच अपेक्षा होती की, शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी किती मदत देण्यात आली आहे, हे सरकारने स्पष्ट करावे. राज्य सरकारने 3975 कोटी रुपयांची मदत जाहीर केली आहे. त्यामध्ये असे लिहिले आहे की, 2 लाख 72 हजार हेक्टरसाठी ही रक्कम आहे. याचा अर्थ असा आहे की, प्रति हेक्टरी 1250 किंवा 1300 रुपये एवढे अनुदान शेतकऱ्यांना दिले जाणार आहे. इतरही काही उपाययोजना करुन 7700 कोटी रुपयांचे पॅकेज तयार करण्यात आले आहे. या सरकारच्या नियमित योजना आहेत. नालाबंडिंगची कामे, खोलीकरणाची कामे, पाणलोट क्षेत्राची कामे या सरकारच्या नियमित योजना आहेत. या सर्व योजना एकत्रित करुन हे पॅकेज देण्यात आले आहे.

सभापती महोदय, माननीय महसूल मंत्री श्री.एकनाथराव खडसे हे संवेदनशील आहेत. त्यांच्याच बाजूला बसलेले माननीय परिवहन मंत्री श्री.दिवाकर रावते यांनी गेल्या 10 वर्षात ज्या ज्या वेळी विदर्भ, मराठवाडा किंवा राज्याच्या अन्य भागात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली त्या त्या वेळी पदयात्रा काढून त्यांची भूमिका स्पष्ट केली आहे. सन्माननीय श्री.खडसे साहेबांनीही विरोधी पक्षनेता या नात्याने दरवर्षी सभागृहात त्यांच्या भूमिकेचा सतत पाठपुरावा केला आहे. एवढेच नव्हे तर गेल्या महिन्यात माननीय शिवसेना प्रमुख श्री.उद्धवजी ठाकरे यांच्या नेतृत्त्वाखाली त्यांच्या पक्षाचे आमदार संपूर्ण मराठवाड्यात फिरले आणि शेतकऱ्यांना हेक्टरी अनुदान देण्याची मागणी त्यांनी केली होती. आता सत्तारुढ पक्षात आल्यानंतर त्यांची भूमिका कशी बदलली आहे, याचे एक विदारक दृश्य या ठिकाणी आपल्याला बघावयास मिळाले आहे.

सभापती महोदय, माननीय मंत्री श्री.खडसे साहेब आणि श्री.रावते साहेब यांना माझी ही विनंती आहे की, सभागृहात विरोधी पक्षाचे बहुमत आहे. त्यामुळे किमान आम्हाला आमच्या भावना

...8....



SRR/ प्रथम श्री.मंगेश.... 12:20

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये बसलेले असतात.)

श्री.सुनील तटकरे...........

तरी व्यक्त करु द्याव्यात. अशा परिस्थितीमध्ये निवेदन न करता सभागृहाचे कामकाज सुरु ठेवणे, हे प्रथेला धरून होणार नाही. आमची ही भावना आहे की, माननीय महसूल मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांनी पॅकेज संदर्भात काही तरी निवेदन करावे. माननीय परिवहन मंत्री श्री.दिवाकर रावते यांनी त्यांच्या ज्या काही खरोखरीच्या संवेदनशील भावना आहेत, त्या तरी सांगण्याचा प्रयत्न करावा. माननीय श्री.रावते साहेब हे बाळासाहेबांचे भक्त आहेत. त्यांनी छातीवर हात ठेऊन आणि बाळासाहेबांचे नाव घेऊन फक्त हे सांगावे की, सरकारने दिलेले पॅकेज मला मान्य आहे, आम्ही एक शब्द सुध्दा या बाबतीत उच्चारणार नाही.

सभापती महोदय, खाजगी सावकारांना मदत करण्याचे इनडायरेक्ट काम होत आहे.

श्री.एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) : सभापती महोदय, खाजगी सावकारांच्या पाशातून शेतकऱ्यांना मुक्त करण्याला यांचा विरोध असेल तर सरकार हा निर्णय मागे घेण्यास तयार आहे. विरोधी पक्षाच्या विरोधामुळे हा निर्णय मागे घेण्यास सरकार तयार आहे. तथापि, यांनी हे सांगावे की, हा निर्णय चुकीचा आहे, शेतकऱ्यांना कर्जमुक्त करु नये, त्यांना सावकाराच्या पाशातच राहू द्यावे. असे त्यांनी सांगितले तर आम्ही हा निर्णय मागे घेण्यास तयार आहोत.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, माझ्या म्हणण्याचा मतितार्थ हा आहे की, सावकारांकडून शेतकऱ्याने कर्ज घेतले असेल तर अनुदान शेतकऱ्यांच्या हातात द्या. ते थेट सावकाराकडे का जमा करीत आहात ? सावकाराच्या हिताची जपणूक करण्याचे काम कशासाठी होत आहे ? अनुदान शेतकऱ्यांच्या हातामध्ये द्या. सावकाराला आणि तुमच्या अधिकाऱ्याला एकत्रित बसवून खरोखर त्या शेतकऱ्याने कर्ज घेतले आहे किंवा नाही, याची शहानिशा करणे अत्यंत आवश्यक आहे. अन्यथा, काल जेव्हा सभागृहात सरकारचे पॅकेज जाहीर झाले तेव्हा संध्याकाळपासून नवीन सावकारी धंदा सुरु झाल्याचे चित्र आपल्याला पहावयास मिळत आहे आणि ही प्रक्रिया न संपणारी ठरु शकेल. त्यामुळे या निर्णयाबाबत स्पष्टता येण्याची आवश्यकता आहे.

...9....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये बसलेले असतात.)

श्री.सुनील तटकरे...........

सभापती महोदय, कापसाचे उत्पादन चांगल्याप्रकारे आलेले नाही, हे आपणही मान्य केले आहे. केवळ एकरी 10 किलो, 25 किलो एवढेच उत्पादन झाले आहे. त्याबरोबरच आपण अशी घोषणा केली होती की, कापूस उत्पादक शेतकऱ्यांना आम्ही बोनस देऊ.

यानंतर श्री.मा.शिगम........

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. रोझेकर 12:30

श्री. सुनील तटकरे....

आता एक बाब लक्षात आलेली आहे की कापूस उत्पादक शेतकऱ्याला कोणतेही अनुदान मिळालेले नाही, धान उत्पादक शेतकऱ्याला कोणतेही अनुदान मिळालेले नाही. अवकाळी पावसामुळे फळबागांचे प्रचंड प्रमाणावर नुकसान झालेले आहे. काल उत्तर महाराष्ट्रातील जळगाव, धुळे, नंदूरबार या जिल्ह्यांमध्ये गारा पडल्या. या सर्व परिस्थितीचे सरकारला अजिबात गांभीर्य नाही. म्हणून आमची अशी मागणी आहे की, दुष्काळाच्या आपत्तीमध्ये सापडलेल्या शेतकऱ्याला भरीव आर्थिक मदत करुन त्याला न्याय द्यावा.

श्री. भाई जगताप :सभापती महोदय, या सदनाचे नेते ज्यांनी आपले आयुष्य राजकारणामध्ये काढले ते विरोधी पक्षामध्ये असताना जी भाषणे करीत होते, ज्या मागण्या करीत होते तेच मुद्दे आम्ही मांडलेले आहेत, त्याच मागण्या आम्ही केलेल्या आहेत. ज्येष्ठ मंत्री महोदय असे म्हणतात की, "आम्ही देत नाही", हे त्यांचे म्हणणे इष्ट नाही. असे म्हणून ते शेतकऱ्याची चेष्टा करीत आहेत. शेतकऱ्याला सावकाराच्या पाशातून मुक्त करण्यासाठी सावकाराच्या खात्यावर पैसे का वर्ग करता, ते पैसे शेतकऱ्याच्या खात्यावर का वर्ग केले जाणार नाहीत ?

**तालिका सभापती** : काल या विषयावर चर्चा झालेली आहे.

श्री. भाई जगताप : शेतकऱ्याची जमीन,शेतकऱ्याचे घर सावकाराकडे गिरवी आहे. शेतकऱ्यांच्या मुलांना शिक्षण घेता येत नाही. अशा परिस्थितीमध्ये शासन सावकाराच्या खात्यावर पैस वर्ग करीत आहे. हे पैसे शेतकऱ्याच्या खात्यावर जमा करावयास पाहिजे. मंत्री महोदयांनी कापूस, सोयाबीन, धान, कोकणातील उद्ध्वस्त झालेला आंबा, दूध इत्यादीबाबत कोणतीच मदत जाहीर केलेली नाही. शेतकऱ्याला हेक्टरी त्याच्या खात्यावर मदत मिळणे आवश्यक आहे.

श्री. एकनाथराव खडसे (पाटील) (महसूल मंत्री) : सभापती महोदय, काल जे पॅकेज घोषित करण्यात आले त्यामध्ये आपद्ग्रस्तांना मदत घोषित केलेली आहे. शेतकऱ्यांना 3950 कोटी रुपयाची आर्थिक मदत केलेली आहे. फळबागासाठी 850 कोटी रुपये देण्यात येणार आहे. ही मदत

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एकनाथराव खडसे (पाटील)....

शेतकऱ्यांना थेट धनादेशाद्वारे होणार आहे. असे असताना शेतकऱ्यांना मदत केली नाही असे जे विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य सांगत आहेत ते योग्य नाही. शेतकऱ्याला सावकाराच्या कर्जातून मुक्त करण्याची भूमिका सरकारने घेतलेली आहे. शेतकऱ्याने सावकाराकडून कर्ज घेतलेले आहे. ज्या सावकारांनी सहकार विभागाकडे रजिस्ट्रेशन केलेले आहे त्यांना अधिकृत बँकर्स समजले जाते. हे शेतकऱ्याने सावकाराकडून घेतलेले कर्ज सावकाराला दिल्या शिवाय शेतकरी कर्जमुक्त होणार नाही. शेतकऱ्याने सावकाराकडून कर्ज घेतलेले असताना शेतकऱ्याला पैसे कसे देता येतील ? सावकाराच्या पाशातून शेतकऱ्याला मुक्त करावयाचे असेल तर सावकाराला कॉम्पेन्सेट केले पाहिजे. शासनाने घेतलेला हा निर्णय चुकीचा आहे असे विरोधी पक्षातील काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना वाटत असेल तर या निर्णयाचा फेर विचार करावा असे त्यांनी सांगावे. शेतकरी हा सावकाराच्या पाशातून, त्याच्या कर्जातून मुक्त झाला पाहिजे, शेतकऱ्याने सावकाराच्या दरवाजावर जाता कामा नये अशी शासनाची भूमिका आहे. जो कोणी अवैध सावकारी करीत असेल त्याच्यावर सावकारी प्रतिबंध कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात येईल. त्यासंबंधीचा कायदा मागील आठवड्यामध्येच राष्ट्रपतींकडून मंजूर होऊन आलेला आहे.

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य माननीय सभापतींच्या आसनासमोरील वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

**तालिका सभापती** : मी आता पुढील कामकाजाकडे वळतो.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



MSS/ पूर्वी श्री. रोझेकर 12:30

**पृ. शी.** : नागपूर मधील बंद असलेल्या 11 पतसंस्थेच्या ठेवीदारांच्या रकमा परत मिळण्यासंबंधी करावयाची कारवाई

**मु. शी.** : नागपूर मधील बंद असलेल्या 11 पतसंस्थेच्या ठेवीदारांच्या रकमा परत मिळण्यासंबंधी करावयाची कारवाई यासंबंधी डॉ. नीलम गोऱ्हे,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सहकार मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"विदर्भातील नागपूरातील तब्बल ११ सहकारी पतसंस्था सन २००९ पासून बंद असल्याने ६० हजार ठेवीदार वाऱ्यावर असल्याची तक्रार ठेवीदार ज्येष्ठ नागरिक मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी माहे नोव्हेंबर, २०१४ च्या दुसऱ्या आठवड्यात मा.राज्यपालांकडे करणे, या बंद पतसंस्थांमध्ये ५० कोटीच्यांवर रक्कम अडकली असताना शासनाच्या सहकार विभागाच्या तसेच पोलीसांच्या आर्थिक गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांनी संबंधित पतसंस्थेच्या पदाधिकाऱ्यांच्या विरोधात अद्यापपर्यंत कोणतीही कारवाई न करणे, या प्रकरणी सन २०१० पासून आजतागायत सतत संबंधित अधिकाऱ्यांनी वेळकाढूपणाचे धोरण अवलंबिल्यामुळे ठेवीदारांमध्ये निर्माण झालेले नैराश्येचे व चिंतेचे वातावरण, यासंदर्भात शासनाने तातडीने संबंधित सहकारी पतसंस्थांच्या पदाधिकाऱ्यांवर कडक कारवाई करुन ठेवीदारांना त्यांची रक्कम परत मिळण्यासंदर्भात कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

श्री.दादाजी भुसे ( सहकार राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य माननीय सभापतींच्या आसनासमोरील वेलमध्ये येऊन जोरजोराने घोषणा देत असतात.)

डॉ नीलम गोऱ्हे : शासनाने लक्षवेधी सूचनेला जे निवेदन दिलेले आहे त्याने माझे समाधान झ ाालेले आहे. विधानसभेतील तत्कालीन सन्माननीय सदस्य आणि आताचे विद्यमान मुख्यमंत्री श्री.देवेंद्रजी फडणवीस यांनी 2011मध्ये हा प्रश्न विधानसभेमध्ये उपस्थित केलेला होता. या 11 नागरी पतसंस्था अडचणीमध्ये आलेल्या आहेत. या पतसंस्था डबघाईस जाण्याची कारणे काय आहेत, याबाबतीत शासनाने काय कार्यवाही केलेली आहे, तसेच जे फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत त्यासाठी सरकारी वकील नेमण्याच्याबाबतीत सरकार पावले उचलणार आहे काय ?

श्री. दादाजी भुसे : हे खरे आहे की, या 11 नागरी पतसंस्था 2009पासून अडचणीमध्ये आलेल्या आहेत. या 11 पतसंस्थापैकी सावता नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, नागपूर ही संस्था अडचणीतून बाहेर पडली असून तिचे काम सुरळीत सुरु झालेले आहे. उर्वरित 10 सहकारी पतसंस्थांची महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 मधील कलम 88 अन्वये चौकशी सुरु आहे. 2 संस्थांची चौकशी पूर्ण करण्यात आलेली आहे. कळमना अर्बन क्रेडीट सोसायटी मर्या. नागपूर व चैत्यन्यवाडी अर्बन क्रेडीट सोसायटी मर्या. नागपूर या दोन संस्थांच्या दोषी पदाधिकाऱ्यांवर अनुक्रमे 12.25 कोटी रु. व 64.92 लाख रु. एवढ्या रकमेची जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. उर्वरित 5 पतसंस्थांचे 74 संचालक व 3 कर्मचारी यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या भावनांशी शासन सहमत आहे. येणाऱ्या काळात सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे आणि अन्य सर्व संबंधितांची बैठक घेण्यात येईल आणि ठेवीदारांना संरक्षण देण्याच्या दृष्टीने तातडीने निर्णय घेण्यात येईल.

डॉ. नीलम गोऱ्हे : धन्यवाद.

---

....नंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.: जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) विधेयक**

**L.A. BILL NO. XXXIII OF 2014.**

**(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA LAND REVENUE CODE, 1966.)**

श्री.एकनाथराव खडसे-पाटील (महसूल मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2014 चे विधानसभा विधेयक क्रमांक 33 महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, 1966 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडतो.

**तालिका सभापती (श्री.रामनाथ मोते)** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.एकनाथराव खडसे-पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2014 चे वि.स.वि.क्रमांक 33 महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, 1966 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 5 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

(विरोधी पक्षाचे अनेक माननीय सदस्य सभागृहात पोलची मागणी करतात)

श्री.एकनाथराव खडसे : विधेयक विचारात घेण्यात यावे असा मी प्रस्ताव मांडतो.

**तालिका सभापती** : विधानसभा विधेयक क्रमांक 33 संमत करावे काय?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2014 चे वि.स.वि.क्रमांक 33 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

श्री.किरण पावसकर : (माननीय सभापतींच्या आसनासमोर येऊन) सभापती महोदय, आम्ही पोल वेळेवर मागितलेला आहे. हा तांत्रिक मुद्दा आहे.

श्री.भाई जगताप : (वेलमध्ये येऊन) सभापती महोदय, आम्हाला पोल पाहिजे.

(सभागृहामध्ये दोन्ही बाजूचे माननीय सदस्य घोषणा देत असतात)



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथ खडसे : सभापती महोदय, विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी पोल मागितला आहे. पोल घेण्याबाबत आमची हरकत नाही. पुणे विद्यापीठाला सावित्रीबाई फुले यांचे नाव देण्यात यावे असे विधेयक आहे. विरोधी पक्षाच्या सदस्यांनी यांनी पोल मागितला आहे. त्याला आमची संमती आहे. पोल घेण्यात यावा. मताचे विभाजन करावे. पोल घ्यावा. ज्यांचा विरोध आहे त्यांनी मांडावा आणि विरोध करावा.

(सभागृहामध्ये दोन्ही बाजूचे माननीय सदस्य घोषणा देत असतात)

श्री.धनंजय मुंडे : (वेलमध्ये येऊन) सभापती महोदय, आम्हाला बोलण्याची संधी द्या.

(सभागृहामध्ये दोन्ही बाजूचे माननीय सदस्य घोषणा देत असतात)

श्री.एकनाथराव खडसे-पाटील : मी विधेयक क्रमांक-32 याठिकाणी मांडले आहे ते मंजुरीसाठी आलेले आहे. सावित्रीबाई फुले यांचे नाव पुणे विद्यापीठाला द्यावे अशा स्वरूपाचे हे विधेयक आहे. या संदर्भात पोलची मागणी केली आहे. त्यामुळे अनुकूल व प्रतिकूलचा निर्णय सभागृहात व्हावा. आपण त्यासाठी पोल घ्यावा. मताचे विभाजन करावे. सन्माननीय सदस्य सावित्रीबाई फुले यांचे नाव द्यायला विरोध करीत आहेत....(गोंधळ)....ज्यांना विरोध करावयाचा आहे त्यांचे मत या ठिकाणी येऊ द्या.

(विरोधी पक्षाचे अनेक माननीय सदस्य माननीय सभापतींच्या आसनासमोरील मोकळया जागेत येऊन बोलण्याची संधी देण्याची मागणी करीत असतात)

**तालिका सभापती** : माननीय सदस्यांनी अगोदर आसनावर जाऊन बसावे.

श्री.भाई जगताप : (वेलमध्ये येऊन) आम्ही महाराष्ट्र जमीन महसूल संहिता विधेयकावर पोलची मागणी केली आहे.

विधेयक क्रमांक-32 हे विद्यापीठाला नाव देण्याबाबतचे आहे. त्याबाबत आम्ही पोलची मागणी केलेली नाही.

(सभागृहामध्ये दोन्ही बाजूचे माननीय सदस्य घोषणा देत असतात)

**तालिका सभापती** : तुम्ही शांत राहिलात तर तुम्हाला बोलण्याची संधी दिली जाईल. तुम्ही सगळयांनी एकत्र बोलण्यासाठी प्रयत्न केला तर कसे चालेल?

श्री.एकनाथराव खडसे-पाटील : मतदानाची प्रक्रिया सुरु आहे. त्यांनी विधेयक क्रमांक-32 बाबत पोल मागितला आहे. पोल मागितल्यानंतर सन्माननीय सदस्यांना बोलता येणार नाही. पुणे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विद्यापीठाला सावित्रीबाई फुले यांचे नाव द्यावे याला तुम्ही विरोध करीत आहात. या चांगल्या कामाला विरोध करीत आहात.

..3..



(सभागृहामध्ये दोन्ही बाजूचे माननीय सदस्य घोषणा देत असतात)

सावित्रीबाई फुलेंचे नाव द्यावे म्हणून तुम्ही प्रयत्न केला आणि आता त्या नावाला विरोध केला जात आहे ही दुर्दैवी बाब आहे. सावित्रीबाई फुले यांच्या नावाला विरोध करणे तुम्हाला शोभणारे नाही. या ठिकाणी मतदानाची मागणी करीत आहात हे बरोबर नाही. सावित्रीबाई फुले यांचे नाव दिले पाहिजे हा तुमचा आग्रह होता.

**तालिका सभापती** : मी सभागृहाची बैठक 10 मिनिटाकरिता स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक 12.50 ते 1.00 वाजेपर्यंत स्थगित झाली)

----

नंतर खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगिती नंतर )**

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. रामनाथ मोते )**

**तालिका सभापती** : मी सभागृहाची बैठक 1.20 वाजेपर्यंत स्थगित करतो.

( सभागृहाची बैठक दुपारी 1.04 वाजता 20 मिनिटांकरिता स्थगित झाली.)

---------

यानंतर श्री. भारवि........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.रामनाथ मोते.)**

**तालिका सभापती** : मी सभागृहाची बैठक 15 मिनिटांकरिता स्थगित करतो.

(सभागृहाची बैठक 1 वाजून 20 मिनिटांनी 15 मिनिटांकरिता स्थगित झाली.)

........

यानंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**सभापती** :मघाशी सभागृहामध्ये महसूल विभागाच्या विधेयकाची मंजुरीची प्रक्रिया सुरु असतांना फार मोठया आवाजात बोलले गेल्यामुळे या ठिकाणी कोण काय बोलत होते ते या ठिकाणी लक्षातही आले नव्हते. अशा परिस्थितीमध्ये या ठिकाणी काही वक्तव्ये, भाषा वापरली गेली, ती मी जरुर तपासून घेणार असून त्यामध्ये जर काही वक्तव्ये किंवा शब्द वगळणे आवश्यक असतील तर ते वगळण्याच्या संदर्भात मी जरुर प्रयत्न करीन. सभागृहासमोर वि.स.वि.क्रमांक 33 "महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) विधेयक, 2014" चे बिल सुरु होते. या महसूल विभागाच्या बिलाच्या संदर्भातील संपूर्ण सायटेशन वाचून झालेले आहे. हे बिल पासिंग स्टेजच्या शेवटच्या टप्प्यात असताना विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांकडून "पोलची" मागणी करण्यात आली होती. त्यावेळी गोंधळही झाला होता. त्यामुळे मी आता या बिलाची जी शेवटची स्टेज राहिली होती तेवढीच स्टेज वाचून हे बिल पारित करणार आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : सन 2014 चे वि.स.वि.क्रमांक 33 एकमताने संमत झाले आहे.

---

यानंतर श्री. अजित..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण सदनातील परिस्थितीबद्दल सदनाला उद्देशून सांगितले, ते सत्य कथन होते. मघाशी वि.स.वि.क्र.33-जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) विधेयक, 2014 हे शेवटच्या टप्प्यात आले असताना सभागृहात गोंधळ होता, हे ही मान्य आहे. समोरच्या बाकावरुन पोलकरिता मागणी करण्यात येत होती हे देखील बरोबर आहे. त्याच वेळेला "होय"चे बहुमत, "होय" चे बहुमत ऐकू न गेल्यामुळे माननीय महसूल मंत्री श्री.एकनाथराव खडसे (पाटील) यांनी माननीय उच्च व तंत्र शिक्षण मंत्री श्री.विनोद तावडे हे खालच्या सभागृहात असल्यामुळे वि.स.वि.क्र.32-महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक 2014 मांडण्यास सुरुवात केली त्यावेळी सभागृहात गोंधळ सुरु होता. माननीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे (पाटील) यांनी विधेयकाचे वाचन केले त्यावेळी मी त्यांच्या बाजूला बसलो होतो. ते विधेयक वाचत होते आणि माईकही सुरु होता. त्याची नोंद होणे आवश्यक होते. ते योग्य की अयोग्य हे ठरविण्याचा अधिकार आपला आहे. माननीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे (पाटील) यांनी सभागृहात विधेयक वाचले. ते वाचण्याची योग्य वेळ होती की नाही हे ठरविण्याचा आपला अधिकार आहे. पण माननीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे (पाटील) यांनी विधेयक वाचले हे सत्य आहे आणि त्यातून गोंधळ निर्माण झाला, विधेयकाला विरोध का करता, अशातऱ्हेचे वक्तव्य करण्यात आले. माननीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे (पाटील) यांनी विधेयक वाचले होते एवढेच मला आपल्या निदर्शनास आणायचे आहे.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते यांनी येथे जे सांगितले त्याचा अर्थ पहिल्या विधेयकाला आम्ही पोल मागितला होता हे त्यांनी मान्य केले. परंतु पोल न देता "होय"चे बहुमत, "होय"चे बहुमत बोलून ते विधेयक पारित करण्यात आले, एवढे रेकॉर्डवर असू द्यावे.

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: विद्यापीठ (सुधारणा ) विधेयक

L.A. BILL NO. XXXII OF 2014

( A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA UNIVERSITIES ACT, 1994.)

श्री.विनोद तावडे (उच्च व तंत्र शिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, सन 2014 चे वि.स.वि.क्र. 32, महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, 1994 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

**सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2014 चे वि.स.वि.क्रमांक 32, महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम,1994 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, या विधेयकावर भाषण करण्याची फार आवश्यकता नाही. या संदर्भात अध्यादेश काढण्यात आला होता. ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांनी जे महान काम केले, त्या कामाचा परिणाम असा झाला आहे की, आज सन्माननीय सदस्या श्रीमती दिप्ती चवधरी, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्रीमती विद्या चव्हाण या ठिकाणी हिमतीने बोलत आहेत. आज महाराष्ट्रातील सावित्रीच्या लेकी पुरुषांच्या बरोबरीने प्रत्येक क्षेत्रात भाग घेताना दिसत आहेत. पुणे विद्यापीठास ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचे नाव देऊन शाहू-फुले-आंबेडकरांचा वारसा असलेल्या महाराष्ट्राने अतिशय योग्य पाऊल उचलले आहे. तेव्हा सभागृहाने हे विधेयक एकमताने मंजूर करावे अशी माझी सभागृहाला विनंती आहे.

प्रश्न प्रस्तुत झाला.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी या विधेयकावर बोलण्यास सुरुवात करावी.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे (विधानसभेने निवडलेल्या ) : सभापती महोदय, माननीय उच्च व तंत्र शिक्षण मंत्री श्री.विनोद तावडे यांनी वि.स.वि.क्र.32-महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक 2014 येथे मांडले आहे,त्यास पाठिंबा देण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, मी औचित्याच्या मुद्याद्वारे पुणे विद्यापीठास ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचे नाव देण्यात यावे असा विषय मांडला होता. आता त्या संदर्भातील विधेयक मंजूर होत आहे याचा मला आनंद होत आहे.

सभापती महोदय, पुणे विद्यापीठास ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचे नाव देणे हे एक ऐतिहासिक स्वरूपाचे पाऊल आहे. महिलांच्या शिक्षणाबरोबर संपूर्ण समाजाचे परिवर्तन व्हावे यासाठी सावित्रीबाई फुले यांनी अपार कष्ट घेतले. जे समाजसुधारक आहेत, जे धुरीण आहेत ज्यांच्यामुळे समाजाचा पाया उभा राहिला त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आपण अतिशय महत्वाचे पाऊल उचलले आहे. या संदर्भात राज्य सरकारने निर्णय घेतलेला आहे आणि त्यावर आज शिक्कामोर्तब होत आहे त्याबद्दल मी सरकारचे अभिनंदन करते.

सभापती महोदय, मला राजकारण करायचे नाही, परंतु पुणे विद्यापीठाचे नामकरण करण्यात आले त्यावेळी पुणे शहरातील महिला आमदार, महिला नगरसेवक, महिला सामाजिक संस्था, ज्यांनी या प्रश्नासाठी मोर्चे काढले त्या कुणालाही कळविण्यात आले नव्हते. त्यामुळे कोणी लहान होत नाही किंवा मोठे होत नाही. सभागृहात अनवधानाने पोलनुसार विधेयक पारित झाले असते तर ते योग्य झाले नसते. मी या निमित्ताने सांगू इच्छिते की, काही वर्षापूर्वी विधानपरिषदेमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेकरांच्या संदर्भातील ठराव दुर्दैवाने नामंजूर झाला होता. तशा पद्धतीने आज येथे अनवधानाने घडता कामा नये होते. ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचे नाव पुणे विद्यापीठास देऊन त्यांच्याबद्दलची कृतज्ञता व्यक्त केली त्याबद्दल मी सरकारचे अभिनंदन करते आणि या विधयेकाचे मन:पूर्वक स्वागत करुन माझे दोन शब्द पूर्ण करते.

------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोंगेद्र कवाडे (नामनियुक्त ) : सभापती महोदय, माननीय उच्च व तंत्र शिक्षण मंत्री श्री.विनोद तावडे यांनी जे सन 2014 चे वि.स.वि.क्र. 32- महाराष्ट्र विधापीठ (सुधारणा) विधेयक 2014 मांडले त्यास पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, पुणे विद्यापीठास ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचे नाव देण्यात यावे यासाठी आम्ही गेल्या अनेक वर्षापासून संघर्ष, आंदोलने करीत होतो, मार्चे काढत होतो, संमेलने घेत होतो. त्यामध्ये सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे आणि या सदनातील सदस्य होते. या संदर्भात दोन्ही सभागृहात साधकबाधक चर्चा झाली होती आणि तत्कालीन सरकारने त्या संदर्भात योग्य निर्णय देखील घेतला होता. ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचे नाव पुणे विद्यापीठास दिल्यामुळे आज माझ्यासहित या विधिमंडळातील सर्व सन्माननीय सदस्यांना तसेच महाराष्ट्रातील तमाम जनतेला आनंद झालेला आहे. ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचे नाव पुणे विद्यापीठास देऊन आपण त्यांच्या कार्याबद्दल जी कृतज्ञता व्यक्त केली त्याबद्दल मी सरकारचे अभिनंदन करतो, सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांचे मी अभिनंदन करतो. परंतु मला एका गोष्टीची खंत वाटते की, पुणे विद्यापीठाची स्थापना होण्यापूर्वी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांनी पुण्यामध्ये मुलींची शाळा सुरु केली होती. त्यामुळे ज्ञानज्योती सावित्रीबाई फुलेंचे नाव देण्याची मागणी करावी लागते हीच खरी शोकांतिका आहे. छत्रपती शाहू महाराज, महात्मा जोतिबा फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यासाठी मागणी करावी लागते हीच खरी शोकांतिका आहे. पण उशिरा का होईना सरकारने ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली त्याबद्दल मी सरकारचे अभिनदंन करतो, सभागृहाला धन्यवाद देतो आणि अशाचप्रकारे महाराष्ट्राचा लौकिक सातत्याने वाढत रहावा या दृष्टीकोनातून सरकार नेहमी प्रयत्नशील राहील अशी अपेक्षा व्यक्त करुन माझे दोन शब्द पूर्ण करतो.

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती दिप्ती चवधरी (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, माननीय उच्च व तंत्र शिक्षण मंत्री श्री.विनोद तावडे यांनी सन 2014 चे वि.स.वि.क्र. 32- महाराष्ट्र विधापीठ (सुधारणा) विधेयक 2014 मांडले त्यास पाठिंबा देण्यासाठी मी येथे उभी आहे.

सभापती महोदय, पुणे विद्यापीठास ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचे नाव देण्याचा निर्णय या सरकारने घेतला त्याबद्दल मी त्यांचे प्रथम अभिनंदन करते. परंतु मी या निमित्ताने सांगू इच्छिते की, मागील सरकारच्या काळात हा निर्णय घेण्यात आला होता आणि त्यावर आज शिक्कामोर्तब होत आहे. महाराष्ट्रातील तमाम महिला भगिनींचा सन्मान झाल्याचा हा क्षण आहे असे मला येथे आवर्जून सांगावेसे वाटते.

सभापती महोदय, पुणे विद्यापीठास ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचे नाव देण्यासाठी गेली अनेक वर्षे संघर्ष सुरु होता. पुणे विद्यापीठास ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचे नाव देण्यासाठी नगरसेविका, आमदार आणि अनेक संस्थांनी आग्रह धरला होता.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती दिप्ती चवधरी....

आणि त्यासाठी संघर्ष केला. त्यामध्ये प्रामुख्याने सन्माननीय सदस्य श्री.छगन भुजबळ यांचे नाव घेणे आवश्यक आहे. मी महापौर असताना पुणे शहरात ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचे स्मारक असावे अशी अपेक्षा व्यक्त केली होती. ते स्मारक सन्माननीय सदस्य श्री.गिरीष बापट यांच्या मतदारसंघात केले आहे. महात्मा फुले यांनी पुणे शहराच्या परिसरात महिलांसाठी पहिली शाळा सुरु केली होती. सावित्रीबाई फुले यांनी त्या कालखंडात जो त्रास सहन केला त्यामुळेच माझ्यासारख्या ज्या भगिनी आहेत, मग त्या आमदार असतील, नगरसेविका असतील, त्यांच्यासाठी शिक्षणाची दारे खुली झाली. मी तर म्हणेन की, सावित्रीबाई फुले यांच्यामुळेच माझ्यासारख्या भगिनी या ठिकाणी आहेत. महात्मा फुले यांचा वाडा ज्या ठिकाणी आहे त्या शेजारीच पुणे महानगरपालिकेने सावित्रीबाई फुले यांच्या स्मारकासाठी जागा शोधली आणि तत्कालीन माननीय मंत्री श्री.छगन भुजबळ यांच्या हस्ते भूमीपूजन केले. तद्नंतर त्या ठिकाणी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचे भव्य स्मारक उभे केले. मला सांगण्यास अत्यंत आनंद होतो की, त्या स्मारकाचे उद्घाटन सहा महिन्यापूर्वी तत्कालीन मुख्यमंत्री माननीय श्री.पृथ्वीराजजी चव्हाण यांच्या हस्ते थाटामाटात करण्यात आले.

महोदय, प्रत्येक स्त्रीला स्वत:चे माहेरघर वाटावे अशा प्रकारचे उचित स्मारक पुणे शहरात उभे केले आहे. ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांनी महिलांना जो मार्ग दाखविला आहे त्यावरुन माझ्यासारख्या भगिनींना प्रेरणा मिळत राहील. पुणे विद्यापीठाचे केवळ महाराष्ट्रात नव्हे तर संपूर्ण देशात चांगले नाव आहे. पुण्याच्या विद्यापीठाला अगोदर 'पुणे विद्यापीठ' असे नाव दिले होते. परंतु आज त्या विद्यापीठाचे नामकरण होत आहे. पुणे विद्यापीठाला सावित्रीबाई फुले यांचे नाव देणे म्हणजे केवळ महाराष्ट्रातील नव्हे तर संपूर्ण देशातील प्रत्येक स्त्रीचा सन्मान आहे. म्हणून मी या ठिकाणी काँग्रेस पक्षाच्या आणि आपल्या सर्वांच्या वतीने या विधेयकाला पाठिंबा देते व येथेच थांबते. धन्यवाद.

------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन 2014 चे वि.स.वि.क्रमांक-32, महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयकावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, पुणे विद्यापीठाला सावित्रीबाई फुले यांचे नाव देण्यात येत असल्याबाबत मला आज खरोखरच आनंद होत आहे. पुण्यामध्ये 160-170 वर्षांपूर्वी महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी आम्हा महिलांसाठी शिक्षणाची दारे उघडी करुन दिली. आज पुरोगामी महाराष्ट्राच्या महिलांना महत्त्वाचा मान आणि प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी आघाडी सरकारने पुणे विद्यापीठाला सावित्रीबाई फुले यांचे नाव देण्याचा निर्णय घेतला होता. आज या विधेयकाच्या अनुषंगाने ती बाब प्रत्यक्षात येत असल्याबाबत आम्हा सावित्रीच्या लेकींचे ऊर भरुन आले आहे.

महोदय, आघाडी सरकारने पुणे विद्यापीठाला सावित्रीबाई फुले यांचे नाव देण्याचा निर्णय घेतला होता. त्या निर्णयावर आज शिक्कामोर्तब होत आहे. त्यामुळे मला आज खरोखरच खूप आनंद होत आहे. या पुढे पुणे विद्यापीठाला "सावित्रीबाई फुले विद्यापीठ" या नावाने उच्चारले जाणार आहे. पुरोगामी महाराष्ट्र राज्यातील महिलांच्या आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने मी या विधेयकाचे समर्थन करते. जी उज्ज्वल परंपरा आमच्या सरकारने सुरु केली आहे ती विद्यमान सरकारने सुध्दा सुरु ठेवावी अशी अपेक्षा व्यक्त करते व माझे भाषण संपविते.

--------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, पुणे विद्यापीठाला सावित्रीबाई फुले यांचे नाव देण्याबाबत आघाडी सरकारने काय केले आणि आम्ही काय केले हा विषय बाजूला ठेवून हा विषय राज्यातील सर्व जनतेचा असल्यामुळे मी त्याचे स्वागत करतो या निमित्ताने मी एक गोष्ट निदर्शनास आणून देतो की, कालच मी सरकारकडे लेखी मागणी केली आहे की, यशवंतराव चव्हाण महामार्ग संपल्यानंतर पुण्यात धनकवडीपर्यंत जो महामार्ग जातो त्याला "सावित्रीबाई ज्योतिबा फुले महामार्ग" असे नाव देण्यात यावे.

**सभापती** : या ठिकाणी सार्वजनिक बांधकाम मंत्री बसलेले आहेत. त्यांनी या बाबतची गंभीर नोंद घ्यावी.

श्री.चंद्रकांत पाटील : होय.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, माननीय शालेय शिक्षण मंत्री यांनी या विधेयकाच्या निमित्ताने शेवटचे विवेचन करण्यापूर्वी मी त्यांच्या निदर्शनास आणून देतो की, विद्यापीठांचे नामकरण करीत असताना सिनेटच्या माध्यमातून ठराव येतो आणि त्यानंतर त्या संदर्भातील निर्णय घेतला जातो. सोलापूर विद्यापीठाच्या बाबतीत सांगू इच्छितो की, सिनेटने काही ठराव केला नसला तरी सोलापूर विद्यापीठाला अहिल्याबाई होळकर यांचे नाव द्यावे, अशी मी या विधेयकाच्या समर्थनार्थ मागणी करतो.

श्री.माणिकराव ठाकरे : महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी सोलापूर विद्यापीठाला अहिल्याबाई होळकर यांचे नाव देण्यासंदर्भातील सूचना केली आहे. आम्ही सर्व सदस्य त्याचे एकमताने समर्थन करीत आहोत. सर्व पक्षांचे या सूचनेला एकमुखाने समर्थन आहे. मी पुन्हा एकदा सांगतो की, आमचे सुध्दा या सूचनेला समर्थन आहे.

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी सोलापूर विद्यापीठाच्या बाबतीत मुद्दा मांडला. या अनुषंगाने मी सभागृहाला विनंती करु इच्छितो की,....

**सभापती** : मला वाटते प्रथम या विधेयकाची प्रक्रिया पूर्ण करु या. त्यानंतर आपल्याला एक-एक मिनिट संधी देतो.

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : महोदय, मी पुन्हा एकदा विनंती करतो की, सभागृहाने सन 2014 चे वि.स.वि.क्रमांक-32 विचारात घ्यावे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 व 3 विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2014 चे वि.स.वि.क्रमांक-32 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून एकमताने संमत झाला.

**सभापती** : सन 2014 चे वि.स.वि.क्रमांक-32 संमत झाले आहे.

----------

**विद्यापीठ (सुधारणा) विधेयकाच्या अनुषंगाने झालेल्या चर्चेबाबत**

**सभापती** : मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, विद्यापीठ (सुधारणा) या विधेयकाच्या अनुषंगाने काही वेळापूर्वी सभागृहात चर्चा झाली. त्या चर्चेवर मी स्वत: लक्ष देईन. जी चर्चा झाली तशा प्रकारची भावना सभागृहातील कोणत्याही सन्माननीय सदस्यांची नव्हती आणि नाही. पुणे विद्यापीठाला सर्वांच्या सहमतीने सावित्रीबाई फुले यांचे नाव दिले आहे. या संदर्भातील विधेयक एकमताने संमत झाले आहे. त्यामुळे मघाशी जी काही चर्चा झाली असेल ती मी स्वत: तपासून बघेन आणि त्यात काही दुरूस्ती करावी लागली तर जरूर दुरुस्ती करेन.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: श्री. कैलास सत्यार्थी व कु. मलाला युसूफझई यांना शांततेचा जागतिक स्तरावरील "नोबेल पुरस्कार" बहाल केल्याबद्दल त्यांचे अभिनंदन.

**मु.शी.**: श्री. कैलास सत्यार्थी व कु. मलाला युसूफझई यांना शांततेचा जागतिक स्तरावरील "नोबेल पुरस्कार" बहाल केल्याबद्दल त्यांच्या अभिनंदनाचा प्रस्ताव.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने भारत देशातील श्री. कैलास सत्यार्थी व पाकिस्तान देशातील कु. मलाला यांना शांततेसाठी नोबेल पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करणारा प्रस्ताव मांडतो.

दिनांक 10 डिसेंबर, 2014 रोजी नॉर्वेतील ओस्लो शहरामध्ये भारताचे श्री. कैलास सत्यार्थी आणि पाकिस्तानची कु. मलाला युसूफझई यांना सन 2014 चे शांततेचे नोबेल संयुक्तपणे प्रदान करण्यात आले. आजपर्यंत भारताला मिळालेला हा पाचवा नोबेल पुरस्कार आहे. यापूर्वी सन 1913 मध्ये साहित्यासाठी श्री. रविंद्रनाथ टागोर, सन 1930 मध्ये भौतिक शास्त्रातील संशोधनासाठी श्री. सी.व्ही. रमण, सन 1979 मध्ये शांततेसाठी श्रीमती मदर तेरेसा तर तर सन 1998 मध्ये अर्थशास्त्रासाठी श्री. अमर्त्य सेन यांना नोबेल पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. या व्यतिरिक्त मूळ भारतीय वंशाच्या 3 नागरिकांनाही हा पुरस्कार मिळालेला आहे. श्री. हरिगोविंद खुराणा, श्री. सुब्रह्मण्यम चंद्रशेखर, श्री. वेंकटरमण रामकृष्ण यांचा सुध्दा समावेश भारतीय नागरिक म्हणून झाला आहे. नोबेल पुरस्कार विजेते 60 वर्षीय श्री. कैलास सत्यार्थी हे बाल अधिकारासाठी लढणारे प्रख्यात व्यक्तिमत्व आहेत. बाल मजुरी हा सभ्य समाजासाठी एक कलंक असून अशा पीडित मुलांच्या उत्थानासाठी, त्यांच्या अधिकारांचे रक्षण करण्यासाठी ते सतत लढत आले आहेत. या कार्यासाठी त्यांनी सन 1980 मध्ये "बचपन बचाव आंदोलन" या संस्थेची स्थापना केली. केवळ भारतातच नव्हे तर जगातील सुमारे 150 देशांत त्यांचे हे काम सुरूआहे. प्रत्येक भारतीयासाठी ही नक्कीच अभिमानाची बाब आहे की, जगातील बहुतांश देशात बाल मजुरी विरोधातील कायदे अधिक कठोर करण्यामागे श्री. कैलास सत्यार्थी यांच्या कार्याचे मोठे योगदान आहे. मूलतः एक अभियंता असणाऱ्या श्री. कैलास सत्यार्थी यांनी आपल्या करिअरचा विचार न करता एका आदर्श कामासाठी स्वत:ला समर्पित केले. आज ते केवळ भारताचेच नव्हे तर संपूर्ण जगाची शान आहेत, असे म्हणणे चुकीचे ठरणार नाही. मी त्यांचे अभिनंदन करतो आणि पुढील कार्यासाठी शुभेच्छा देतो.

..2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे ....

तसेच, पाकिस्तानची कु. मलाला युसूफझई ही केवळ 18 वर्षांची असून नोबेल पुरस्कार पटकावणारी ती आजवरची सर्वांत तरूण विजेती आहे. शिक्षणाचा अधिकार विशेषत: मुलींच्या शिक्षणाच्या अधिकारासाठी उभ्या केलेल्या लढ्यामुळे तिला हा पुरस्कार प्रदान करण्यात आलेला आहे. पाकिस्तानमध्ये तिचे निवासस्थान असलेल्या स्वात प्रांतात 7 वर्षांपूर्वी अतिरेक्यांनी शाळा बंद पाडण्याचा निर्णय घेतला. शाळेमध्ये जाण्यास त्यांनी बंदी घातली. सुमारे 400 शाळा उद्ध्वस्त केल्या. अतिरेक्यांच्या भीतीमुळे बहुतांश मुलांचे शिक्षण थांबले. परंतु मलालाने अतिरेक्यांपुढे झुकण्यास नकार दिला. अतिरेक्यांची कृत्ये तेथील प्रसारमाध्यमांच्या सहकार्याने जगासमोर मांडली. स्वात प्रांतातील शिक्षण व्यवस्था पूर्ववत व्हावी यासाठी जागतिक समुदायाकडून सहकार्य मागितले. तिचा हा विरोध अतिरेक्यांना सहन होणे शक्य नव्हते. त्यांनी दिनांक 9 ऑक्टोबर, 2012 रोजी मलालाच्या डोक्यात गोळ्या घातल्या. सुदैवाने या जीवघेण्या हल्ल्यातून ती बरी झाली आणि आता केवळ पाकिस्तानच नाही तर जगातील विविध दहशतवादी वादग्रस्त देशांतील मुलांच्या शिक्षणासाठी ती लढत आहे. मलाला युसूफझई हिला हा पुरस्कार मिळाल्याबद्दल आम्ही तिचे हार्दिक अभिनंदन करतो.

प्रख्यात व्यक्तिमत्व श्री. कैलास सत्यार्थी आणि पाकिस्तानच्या नोबेल पुरस्कार मिळालेल्यांमध्ये सर्वांत तरूण असलेल्या कु. मलाला युसूफझई या दोन्ही श्रेष्ठ व्यक्तींचे अभिनंदन करणारा प्रस्ताव मी आपल्या सदनामध्ये मांडला आहे. आपण सर्वानुमते त्याला अनुमोदन द्यावे.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी मांडलेला प्रस्ताव उचित आहे.

दिनांक 10 डिसेंबर, 2014 रोजी नॉर्वेतील ओस्लो शहरात भारताचे श्री. कैलास सत्यार्थी आणि पाकिस्तानची कु. मलाला युसूफझई यांना सन 2014 चा शांततेचा नोबेल पुरस्कार संयुक्तपणे प्रदान करण्यात आला. हा भारताचा आणि आशिया खंडाचा फार मोठा सन्मान आहे. आयुष्यभर त्याग करणाऱ्या, गरीब, सामान्य माणसांची, मुलांची सेवा करणाऱ्या भारतीय व्यक्तीला तो सन्मान मिळाला आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** ....

त्याचबरोबर, कु. मलाला युसूफझई या 18 वर्षांच्या मुलीला हा सन्मान मिळाला आहे. अनेक दहशतवादी हल्ल्यांना दाद न देता तिने अल्प वयात केलेले कार्य अत्यंत लौकिकास्पद आहे. ही विधानपरिषद या दोघांचेही अभिनंदन करते.

----

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू श्री. राजन वेळूकर यांच्या नियुक्तीच्या संदर्भात दिलेल्या निर्णयाबाबत</u>**

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, आज सदनामध्ये विधेयक संमत करून पुणे विद्यापीठाचे नामकरण सावित्रीबाई फुले विद्यापीठ या नावाने करून या क्षेत्रातील अत्यंत ऐतिहासिक निर्णय घेतला.

परंतु, दुर्दैवाने आजच्या वर्तमानपत्रात मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरूपदी श्री. राजन वेळूकर यांची निवड चुकीची असल्याचे मत व्यक्त केले आहे. त्यांच्या पात्रतेचा फेरविचार करावा, असाही निर्देश उच्च न्यायालयाने दिला आहे. श्री. राजन वेळूकरांची नियुक्ती होऊन 3 वर्षांपेक्षा अधिकचा कालावधी झाला आहे. सदर प्रकरणी फेरतपासणी होईपर्यंत सदरच्या कुलगुरूंना त्या पदावर काम चालू ठेवण्यास सांगणे हे कोणत्याही दृष्टीने सयुक्तिक होत नाही. त्याबाबत माननीय उच्च शिक्षणमंत्र्यांनी तातडीने हस्तक्षेप करून निर्णय घ्यावा, अशी मी विनंती करीत आहे.

**सभापती** : माझ्याकडे काही सन्माननीय सदस्यांचे औचित्याचे मुद्दे आले आहेत. मी सर्वप्रथम श्री. रामराव वडकुते यांना बोलण्यास संधी देतो.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरूंच्या संदर्भात उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या बाबतीत मुद्दा मांडला आहे आणि मी देखील योगायोगाने सभागृहात उपस्थित आहे. त्यामुळे आताच या संदर्भातील स्पष्टीकरण देतो. आम्ही विरोधी पक्षात असताना तत्कालीन सरकारकडे याबाबत स्पष्टीकरणाची वेळोवेळी मागणी करीत होतो परंतु आम्हाला कधीच मिळाले नाही. आमचे संवेदनशील सरकार असल्यामुळे आम्ही ते देत आहोत.

काल उच्च न्यायालयामध्ये हा विषय झाला. काल दुपारनंतर माध्यमांद्वारे सर्व माहिती मिळाली. सदर बाबतीत मी एक गोष्ट सांगू इच्छितो की, विद्यापीठाची स्वायत्तता असते. त्यामुळे शिक्षणमंत्री कुलगुरूंना आदेश निर्गमित करू शकत नाहीत. सभागृहाने या संदर्भात भावना मांडल्या आहेत. शिवसेनेच्या युवा सेनेचे अध्यक्ष श्री. आदित्य ठाकरे, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, राष्ट्रवादी युवा संघटना यांनी देखील या संदर्भात भावना मांडल्या आहेत. सन्माननीय सदस्य

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे....

श्री. चव्हाण साहेबांनी देखील या संदर्भात भावना मांडल्या आहेत. सभागृहाच्या भावना कुलपती म्हणून माननीय राज्यपालांपर्यंत नक्की पोहचविण्यात येतील. दरम्यान ॲडव्होकेट जनरल यांच्याशी संपर्क साधून उच्च न्यायालयाने प्रत्यक्ष काय म्हटले आहे, त्याची माहिती घेतो.

( नंतर श्री. रोझेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.......

या संदर्भात माध्यमांमधून आलेली माहिती अपूर्ण आहे. न्यायालयाच्या निर्णयात सर्च कमिटीच्या फंक्शनिंग विषयी म्हटले आहे की, सर्च कमिटीच्या अभ्यासक्रमाविषयी म्हटले आहे, याची माहिती संध्याकाळपर्यंत देतो, असे ॲडव्होकेट जनरल म्हणाले आहेत. ही माहिती आल्यानंतर आपल्या सर्वांच्या भावना राज्यपाल महोदयांपर्यंत मी पोहोचवीन.

-------------

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>पुणे विद्यापीठाला सावित्रीबाई फुले यांचे नाव देण्याच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या मागण्यांबाबत</u>**

श्री.रामराव वडकुते : सभापती महोदय, पुणे विद्यापीठाला सावित्रीबाई फुले यांचे नाव देण्याबाबत शासनाने जो निर्णय घेतला आहे, त्याबद्दल मी शासनाला धन्यवाद देतो. तथापि, या माध्यमातून सोलापूर विद्यापीठाला अहिल्याबाई होळकर यांचे नाव देण्याबाबत जो प्रस्ताव देण्यात आला आहे, त्यासंबंधी आपल्याबद्दल, सर्व सन्माननीय सदस्यांबद्दल आदर व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, ज्या मातेने दीडशे वर्षापूर्वी महिलांना शिक्षणाची दारे उघडी करुन दिली, त्या मातेचे नाव पुणे विद्यापीठाला देण्याबाबत या पूर्वीच्या सरकारने ठरविले होते आणि या शासनाने त्या निर्णयावर शिक्कामोर्तब केले आहे, याबद्दल दोन्ही सरकारांचे मी अभिनंदन करतो आणि सदनाला धन्यवाद देतो.

सभापती महोदय, आताच या ठिकाणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे माननीय अध्यक्ष व सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी एक प्रस्ताव मांडला आहे. यापूर्वी आम्ही सातत्याने सरकारकडे मागणी करीत आहोत. गेल्या वर्षी समाजाच्या वतीने सोलापूर येथे खूप मोठा संघर्ष झ ाला होता. सिनेटचा ठराव दोन वर्षापासून बारगळवला जात आहे. आपल्या मार्फत मी शासनाला विनंती करतो की, सोलापूर विद्यापीठाला अहिल्याबाई होळकर यांचे नाव देण्याबाबत लवकरात लवकर विचार करावा.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी केलेली सूचना अतिशय महत्त्वाची आहे. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री महोदयांना मी विनंती करतो की, त्यांनी या सूचनेचा पाठपुरावा करावा.

श्री.विनोद तावडे : होय.

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, आज सभागृहात पुणे विद्यापीठाला सावित्रीबाई फुले यांचे नाव देण्याबाबतचा निर्णय झालेला आहे. त्या प्रमाणेच मुंबई विद्यापीठाला राजमाता जिजाऊ यांचे नाव देण्याची प्रक्रिया शासनाने सुरु करावी व उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाला बहिणाबाई चौधरी यांचे नाव द्यावे, अशी मी शासनाला विनंती करतो.

**सभापती** : माननीय उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी याही सूचनेची नोंद घ्यावी.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, होय.

...3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामहरी रुपनवर : सभापती महोदय, या सरकारने आज जो निर्णय घेतला आहे, त्याची इतिहासामध्ये नोंद होईल. परंतु, त्या बरोबरच सोलापूर विद्यापीठाला अहिल्याबाई होळकर यांचे नाव देण्याबाबत पूर्वी ठरविण्यात आले होते. त्याचे कारण असे आहे की, सध्या राजकारणाबद्दल काहीही बोलले जाते. परंतु, नीती आणि चारित्र्यामधून राजकारणाचा मेळ घालून सामान्य जनतेचे हित बघण्याकरिता महादेवाची पिंड हातात घेऊन अशाच व्यासपीठावर निर्णय करण्याची प्रक्रिया आपल्या देशात अहिल्याबाई होळकर यांनी पार पाडली. जगातील थोर तत्त्ववेत्ता जॉन मालकम असे म्हणतो की, "राज्यसत्ता जर हातात असेल तर तिचा वापर कुठे, कधी, किती आणि कसा करावा, याचे जगातील मूर्तिमंत उदाहरण म्हणजे अहिल्याबाई होळकर या होत." अहिल्याबाईंनी महादेवाची 5 हजार मंदिरे बांधली, बुध्दविहारे बांधली आणि मुस्लीम राज्यकर्त्यांच्या संमतीने मशिदीही बांधल्या. सर्व जातीधर्मांचा मेळ घालणारी राज्यकर्ती म्हणून त्यांचे स्मारक साकार होण्याकरिता सोलापूर विद्यापीठाला अहिल्याबाईंचे नाव दिले गेले पाहिजे, अशी जी सूचना सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे आणि सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी केली आहे, त्याला माझा पाठिंबा आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, सन्माननीय शिक्षण मंत्री सभागृहात उपस्थित आहेत, विविध सन्माननीय सदस्य विविध मुद्दे उपस्थित करीत आहेत आणि सरकारकडून त्यांच्या मुद्यांना ताबडतोब प्रतिसाद मिळतो आहे, ही निश्चितपणे आशादायक गोष्ट आहे.

सभापती महोदय, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाला बहिणाबाई चौधरी यांचे नाव देण्याच्या संदर्भात जी सूचना आलेली आहे, ती निश्चितपणे स्वागतार्ह आहे. पण या निमित्ताने आपल्या माध्यमातून मला शिक्षण मंत्री महोदयांच्या असे निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, वेगवेगळ्या स्मारकांबाबत वेगवेगळी नांवे येत असतात. त्या मागण्यांबद्दल विचार करणे आणि त्या संदर्भात प्रक्रिया निश्चित करण्याबाबत पावले उचलून एक निश्चित कालमर्यादा ठरविली तर त्यामधून समाजामधील सलोखा आणि लोकांच्या अपेक्षा यांचा समन्वय साधला जाऊ शकेल.

सभापती महोदय, अहिल्याबाई होळकरांचे नाव सोलापूर विद्यापीठाला देण्यासंबंधी जी सूचना करण्यात आली आहे, ती देखील स्वागतार्ह आहे.

...4....



SRR/ प्रथम श्री.मंगेश........ 14:10

डॉ.नीलम गोऱ्हे..........

सभापती महोदय, मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरूंची नियुक्ती नियमबाह्य असण्याच्या संदर्भात न्यायालयाने निर्णय दिला आहे. त्यांच्या नियुक्तीला 3 वर्षे झाली असली तरी जे अयोग्य आहे ते अयोग्यच ठरते, हे दिसून आले आहे. या संदर्भात शिक्षण विभागाने घेतलेल्या भूमिकेचे मी स्वागत करते.

सभापती महोदय, या निमित्ताने उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाला बहिणाबाई चौधरी यांचे नाव द्यावे, अशीही मी विनंती करते आणि थांबते.

(काही सन्माननीय सदस्य एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

**सभापती** : माझ्याकडे काही औचित्याचे मुद्दे आले आहेत. ते मांडण्यासाठी अगोदर मी परवानगी देतो आणि नंतर मी आपला विचार करतो.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रूपन यांनी अहिल्याबाई होळकर यांच्या कार्याचा चांगला परिचय दिला आहे. परंतु, त्यांनी एक असे वैशिष्ट्य मांडले की, अहिल्याबाईंनी मंदिरे बांधली, भरपूर काम केले. पण मशिदी बांधताना मात्र त्यांना मुसलमानांची परवानगी घ्यावी लागली. मुस्लीम समाजात परवानगीशिवाय कशालाही हात घालता येत नाही. इतर सर्व धर्मात मात्र तशी परिस्थिती नाही. सन्माननीय सदस्यांनी जे मांडले आहे त्याचा मी फक्त पुनरूच्चार करीत आहे. धन्यवाद.

---------------

...5.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: औचित्याचे मुद्दे

**सभापती** : आता औचित्याचे मुद्दे घेण्यात येतील.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, राज्यातील विनाअनुदानित तत्त्वावरील शाळांचे जिल्हा, विभाग आणि राज्य स्तरावर मूल्यांकन होते आणि त्यानंतर हे सर्व प्रस्ताव अनुदानासाठी शासनाला सादर केले जातात. शासनाकडे हे प्रस्ताव आल्यानंतर त्याची छाननी होते, कागदपत्रांची पडताळणी होते आणि मूल्याकनानुसार ज्या शाळा पात्र ठरत असतील त्या अनुदानास पात्र आहेत, असे घोषित करण्यात येते, तसा शासन निर्णय निर्गमित केला जातो.

सभापती महोदय, राज्याच्या शालेय शिक्षण विभागाकडे आलेल्या अशा प्रकारच्या प्रस्तावांना त्या विभागाने मंजुरी दिली, या संदर्भातील आदेश निर्गमित झाले, त्या शाळा अनुदानास पात्र आहेत, असे घोषितही झाले. मात्र, जिल्हा, विभाग आणि राज्य स्तरावर एकदा पडताळणी झ ाल्यानंतर पुन्हा आता या शाळांच्या मूल्यांकनाची फेरतपासणी सुरु झालेली आहे. माझी या निमित्ताने एवढीच मागणी आहे की, जर मूल्यांकनासंदर्भात काही शंका असतील, काही आक्षेप असतील तर प्रत्यक्ष आदेश देताना सुध्दा फेरतपासणी किंवा मूल्यांकनबाबत संबंधित शाळांना आदेश देता येतील.

सभापती महोदय, या सर्व प्रक्रियेमध्ये काही गैरप्रकार झाले असतील तर तेही आम्हाला मान्य आहेत. पण काही विशिष्ट शाळांसाठी सर्व शाळांचे अनुदान थांबविणे, हे योग्य नाही. त्यामुळे त्या शाळा वगळून अन्य शाळांचे अनुदान तातडीने द्यावे आणि त्यांची फेरपडताळणी थांबवावी, अशी विनंती मी आदरणीय नामकरण मंत्री, माफ करा, शिक्षण मंत्री महोदयांना करतो.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांचा मुद्दा व्हॅलिड आहे. या सर्व प्रक्रिया पूर्ण झालेल्या आहेत. प्रक्रिया पूर्ण करीत असताना स्वाभाविक काही अधिकची माहिती आल्यानंतर त्या प्रक्रियेविषयी थोडे रिकन्फर्मेशन सुरु आहे. परंतु, त्यांनी ज्या सूचना मांडल्या आहेत, त्या सूचनांवर आम्ही योग्य वेळी निर्णय घेऊ.

------

...6....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल भोसले : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, सन 2011 मध्ये शासनाने मागासवर्गीय विद्यार्थी, विद्यार्थीनी यांच्यासाठी स्वतंत्र वसतिगृह इमारतीची योजना जाहीर केली होती. त्यानुसार सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मौजे रायपाटण येथे 100 विद्यार्थी क्षमतेचे वसतिगृह बांधण्यात येऊन त्यासाठी रक्कम रुपये 5 कोटी मंजूर करण्यात आले आहेत.

यानंतर श्री.मा.शिगम........

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनिल भोसले...

तसेच सदर काम पुण्यातील स्कायलार्क कंपनीला देण्यात येणे, तथापि सदर वसतिगृहाच्या इमारत बांधकामाला तीन वर्षापूर्वी सुरुवात होऊनही अद्यापि सदरची इमारत अपूर्णावस्थेत असल्याने मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या हक्काच्या निवाऱ्याचा प्रश्न निर्माण होणे, या योजनेसाठी आवयश्क असलेला निधी सामाजिक न्याय विभागामार्फत मंजूर करुन तो संबंधित शासकीय यंत्रणेकडे दोन वर्षापूर्वीच सुपूर्द करण्यात येणे, असे असताना सामाजिक न्याय विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी नकारात्मक भूमिका स्वीकारल्यामुळे सदर इमारतीचे काम अद्यापही ठप्प असणे, परिणामी दोन्ही विभागाच्या नकारात्मक भूमिकेमुळे रायपाटण पंचक्रोशीवासीयांमध्ये/स्थानिक नागरिकांमध्ये नाराजी व संताप व्यक्त होणे, रायपाटण गावी मंजूर झालेल्या 100 मागासवर्गीय विद्यार्थी वसतिगृहाची इमारत त्वरित बांधण्याबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करावी अशी मागणी मी औचित्याच्या मुद्याद्वारे करीत आहे.

---

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामराजे नाईक-निंबाळकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, लोणंद-फलटण-बारामती प्रकल्पाकडे मी शासनाचे या औचित्याच्या मुद्याद्वारे लक्ष वेधित आहे. सुमारे 78 कि.मी.चा हा रस्ता असून या रस्त्याची सुरुवातीची किंमत 382 कोटी रु. आहे. परंतु भूसंपादन ज झाल्यामुळे दिवसेंदिवस जमिनीची व रस्त्याची किंमत वाढत आहे. मागच्या शासनामध्ये अनेक वेळा बैठका होऊनही या रस्त्याला मूर्त स्वरुप प्राप्त झालेले नाही. या औचित्याच्या माध्यमातून माझी शासनाला विनंती आहे की, या बाबतीत लवकरात लवकर कारवाई करावी. आज सकाळी मला अशी माहिती प्राप्त झाली की, या रस्त्याच्या बाबतीत सन्माननीय बांधकाम मंत्री महोदयांनी बैठक बोलावलेली आहे. हा प्रकल्प आमच्याही जिल्ह्यातील असल्यामुळे सदर बैठकीस आम्हाला देखील बोलावून आमच्या सातारा जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांना देखील बोलवावे अशी माझी मंत्री महोदयांना विनंती आहे.

---

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.निरंजन डावखरे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

पालघर जिल्ह्यातील नालासोपारा येथे अशोककालीन बुद्ध लेणी व स्तुपाचे अवशेष 2010मध्ये आढळून आलेले आहेत. सदर स्तुपाचा जीर्णोध्दार करण्यात येणार असल्याचे सन 2010मध्ये जाहीर करण्यात आले. इतकेच नव्हेतर या जीर्णोद्धाराच्या कार्यासाठी शासनाने 8 कोटी रुपये निधी मंजूर केला होता. तथापि, ही प्राचीन कालीन बुद्ध लेणी व स्तुपाच्या जीर्णोद्धारासाठी निधी मंजूर करुन 4 वर्षाचा कालावधी लोटला असताना देखील अद्याप जीर्णोद्धाराचे कार्य सुरु करण्यात आलेले नाही. सदर अशोककालीन स्तुपाचा जीर्णोद्धार झाल्यानंतर ते पर्यटकांना आकर्षिक करणारे असे पर्यटन स्थळ विकसित होऊन शासनाला त्याद्वारे चांगला महसूलही प्राप्त होऊ शकेल. ही बाब लक्षात घेऊन नालासोपारा येथे आढळून आलेल्या अशोककालीन स्तुपाच्या जीर्णोद्धारासाठी दिलेला 8 कोटी रुपयाचा निधी खर्च करण्यास टाळाटाळ करणाऱ्या संबंधिता विरुध्द कारवाई करुन स्तुपाचे रखडलेले जीर्णोद्धाराचे कार्य सुरु करण्यात यावे अशी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनास विनंती करीत आहे.

---

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, मी महत्वाच्या व निकडीच्या बाबीवर औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

अनेक दुर्धर आजाराच्या रुग्णांना उपचार व औषधे स्वस्त मिळावित यासाठी केन्द्र सरकारने कायदा करुन शेडयूल के अंतर्गत शेकडो औषधे जीवनावश्यक वस्तूंच्या यादीत समाविष्ट केलेली आहेत. परिणामी किंमतीवर नियंत्रण आल्यानंतर औषधांच्या किंमती 70 टक्के कमी झालेल्या आहेत. परंतु औषधांचा साठा कमी झालेला असल्यामुळे औषध कंपन्यांनी, लिव्हर, अस्थमा, मधुमेह, किडनी इत्यादी रोगावरील औषधांचा तुटवडा निर्माण केलेला आहे. दुसरीकडे साठेबाजांनी बाजारातील साठा गायब केलेला असल्यामुळे हजारो रुग्णांना त्या औषधांसाठी दुप्पट किंमत मोजावी लागत आहे. उपचाराचा खर्चही वाढलेला असल्यामुळे असंख्य रुग्णांना असंख्य अडचणींचा सामना करावा लागत आहे. विधिमंडळाचे अधिवेशन राज्याच्या नागपूर या उपराजधानीमध्ये चालू असताना अल्ब्युमीन हे औषध साठेबाजांनी बाजारातून गायब केलेले आहे. सर्वसाधारणपणे या औषधाची किंमत 2 ते 3 हजार रुपये असताना नागपूर या उपराजधानीमध्ये या औषधासाठी 5 ते 8 हजार रुपये मोजावे लागत आहेत. नागपूर मधील औषधाचा तुटवडा दूर करणे शासनाला सहज शक्य आहे. या सर्व बाबी लक्षात घेता साठेबाज,औषध कंपन्या व विक्रेते यांच्यावर अंकुश लावून याबाबतीत तातडीने कारवाई करावी. अन्यथा किडनी, लिव्हर, मधुमेह या आजारांचे रुग्ण मृत्युशय्येवर जाण्याची शक्यता आहे हे मी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाच्या निदर्शनास आणून देत आहे.

**सभापती** : विभागाने ही बाब आरोग्य मंत्री महोदयांकडे पाठविण्याची व्यवस्था करावी.

---

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

राज्याचे माजी उप मुख्यमंत्री आदरणीय कै. गोपीनाथ मुंडे यांचा आज जन्म दिवस. त्यांनी आयुष्यभर जनतेच्या कल्याणासाठी तसेच सर्वसामान्य माणूस, शेतकरी, कष्टकरी, शेतमजूर यांना न्याय मिळवून देण्यासाठी अनेक वर्षे काम केले. जनतेच्या प्रश्नासाठी सातत्याने संघर्ष केला आणि त्यांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला. सामान्य ऊसतोड कामगाराच्या कुटुंबामध्ये जन्माला येऊन लाखो ऊसतोड कामगारांचे त्यांनी नेतृत्व केले. या ऊसतोड कामगारांच्या अडचणी काय आहेत हे आपणास माहीत आहे. या ऊसतोड कामगारांना न्याय देण्यासाठी स्व. गोपीनाथ मुंडे यांच्या नावाने स्वतंत्र ऊसतोड कामगार आर्थिक विकास मंडळ स्थापन करावे अशी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनास मी विनंती करीत आहे.

**सभापती** : शालेय शिक्षण मंत्री श्री. विनोद तावडे यांनी या औचित्याच्या मुद्याची नोंद घेऊन संबंधित विभागाला कळवावे.

श्री. विनोद तावडे : होय.

----

..6..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, मला दुसऱ्यांदा औचित्याचा मुद्दा मांडण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपला आभारी आहे.

सभापती महोदय, माननीय शालेय शिक्षण मंत्री श्री. विनोद तावडे व ज्यांना मराठीचा ध्यास आहे असे माननीय परिहवन मंत्री आदरणीय श्री. दिवाकर रावते हे सभागृहामध्ये उपस्थित आहेत. आता नव्या शासनाच्या काळामध्ये हा विषय अधिक गांभीर्याने घेतला जाईल अशी मला खात्री आहे. तो विभागही मंत्री महोदयांकडे आहे. या सभागृहामध्ये मराठी साहित्यात महत्वाचे योगदान देणाऱ्या लोकांची दखल घेऊन त्यांचे साहित्य मोठ्या प्रमाणावर राज्यामध्ये उपलब्ध करून देण्याची आवश्यकता आहे. आपल्या बिनधास्त लेखनशैलीने मराठी साहित्याला एक वेगळे वळण देणारे चंद्रकांत खोत यांचे नुकतेच दुर्दैवी निधन झाले. ज्ञानेश्वरीचे पुनर्लेखन करावे अशी त्यांची शेवटची इच्छा होती. परंतु निवारा नसल्यामुळे एका मंदिराच्या आसऱ्यात त्यांना आयुष्याचे शेवटचे दिवस घालवावे लागले आणि हे लेखन राहून गेले. परंतु अत्यंत दर्जेदार आणि एका वेगळया विषयाकडून थेट अध्यात्मापर्यंतची झेप असणारा मराठी साहित्यातला हा फार मोठा साहित्यिक आपल्यातून निघून गेलेला आहे. फकिरी प्रवृत्तीने त्यांच्या आयुष्याचा शेवट झालेला आहे. त्यांचे कार्य लोकांपर्यंत नेण्यासाठी मराठी भाषेचा आणि साहित्याचा सन्मान अधिक उच्चस्तरावर नेण्यासाठी आपण चंद्रकांत खोत यांचे साहित्य आणि नवसाहित्यिकांसाठी एक योजना हाती घ्यावी ज्या योगे त्यांचे कायमचे स्मरण रसिकांच्या मनामध्ये राहील. माझ्या या विनंतीचा विचार करावा अशी माझी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनास विनंती आहे.

**सभापती** : या विषयी सन्माननीय शालेय शिक्षण मंत्री श्री. विनोद तावडे यांनी लक्ष घालणे आवश्यक आहे. त्यांनी स्वत: या विषयामध्ये लक्ष घालावे.

श्री. विनोद तावडे : होय.

---

...7...



श्री. जयवंतराव जाधव : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नाशिक जिल्हयातील निफाड, येवला, मालेगाव, देवळा, बागलाण व दिंडोरी इत्यादी तालुक्यात पावसासोबत मोठमोठ्या गारा पडल्यामुळे द्राक्ष, डाळिंब इत्यादी फळपिकांसह कपाशी, कांदा, भाजीपाला, हरभरा, गहू यासह रब्बीच्या पिकांची मोठी हानी होणे, अजूनही पावसाची वेधशाळेने व्यक्त केलेली शक्यता, या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांचे करोडो रुपयांचे नुकसान झाल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र चिंतेचे वातावरण निर्माण झालेले असल्यामुळे नुकसानग्रस्त भागातील पिकांचे तातडीने पंचनामे करुन सदर शेतकऱ्यांना जास्तीत जास्त आर्थिक मदत देण्याची आवश्यकता आहे असे या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाच्या निदर्शनास आणून देत आहे.

---

...नंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, माजी न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली गृह विभाग, महाराष्ट्र शासन यांनी महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी आणि प्रचलित कायद्यातील तरतुदींचा अभ्यास करण्यासाठी व त्या अनुषंगाने शिफारशी करण्यासाठी एक समिती प्रस्थापित केली आहे. त्या समितीमध्ये महिला आमदार, सामाजिक संघटनांनी तीन वर्षे काम करुन 5 महत्वाचे अंतरिम अहवाल सादर केले असून दिनांक 2 डिसेंबर रोजी अंतिम अहवाल राज्य सरकारमार्फत उच्च न्यायालयाला सादर केलेला आहे. या अहवालांमधील अनेक शिफारशींची अंमलबजावणी झाली असून 40 शिफारशींची कृती झालेली नाही. म्हणून सरकारने अंतिम अहवाल सादर केला असला तरी शिफारशींची अंमलबजावणी करण्यासाठी संनियंत्रण करणे, देखरेख करणे यासाठी गृह विभागाने मॉनिटरिंग करणारी यंत्रणा निर्माण करावी अशी मी याद्वारे मागणी करीत आहे.

--------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी 7 डिसेंबर, 2014 रोजी दिल्ली येथे पत्रकार परिषदेत मुंबईच्या विकासासाठी व मुंबईला जागतिक व्यवसाय केंद्र बनविण्यासाठी एक उच्चाधिकार समिती स्थापन करण्याची मागणी केली आहे. त्यात अनेक प्रश्नांना न्याय देण्यासाठी ही समिती स्थापन करण्याची भूमिका त्यांनी मांडली आहे. मुंबई शहराचे जे काही प्रश्न आहेत त्यात बाहेरुन येणारे लोंढे, त्याचबरोबर शहरातील पूर्व किनारपट्टीला विकसित करण्यासाठी शिवसेना पक्ष प्रमुख श्री.उध्दवजी ठाकरे यांनी व्हिजन डॉक्यूमेंटमध्ये मांडलेली रचना त्याचबरोबर केंद्र सरकारकडे प्रलंबित असलेले मुद्दे याबाबतचे टर्म्स ॲंड रेफरन्स हे मुंबई महापालिकेच्या स्वायत्ततेवर कोणताही अधिक्षेप न करता कशा पध्दतीने मुंबईकरांना न्याय मिळवून देणार आहे याबाबत विधिमंडळाचे अधिवेशन सुरु असल्यामुळे सभागृहात सरकारने खुलासा करावा अशी मी या निमित्ताने मागणी करते.

----------

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय,नागपूर हे उपराजधानीचे शहर असून या शहराची लोकसंख्या 25 लाख इतकी आहे. नियमितपणे दररोज 1.35 लाख प्रवासी बसमधून प्रवास करीत असतात. शहरात 1000 बसेसची आवश्यकता असताना केवळ 210 बसेस रस्त्यावर धावत आहेत. आजच्या तारखेला 260 बसेस किरकोळ दुरुस्तीसाठी बंद पडलेल्या आहेत. शहरातील खाजगी बससेवा बंद असल्यामुळे उपराजधानी असलेल्या या शहरात पुरेशा प्रमाणात बससेवा मिळत नाही. म्हणून प्रवाशांना पुरेशी बससेवा मिळावी अशी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे मागणी करीत आहे.

-----------------

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रभाकर घार्गे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, राज्यातील प्रादेशिक अनुशेषाबाबत केळकर समितीचा अहवाल तत्कालीन माननीय मुख्यमंत्र्यांना सादर होऊन बराच कालावधी झालेला असून सदर अहवाल लवकरात लवकर विधिमंडळाच्या सभागृहामध्ये सादर करण्यात यावा अशी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे मागणी करीत आहे.

--------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरु पदावर 2009 मध्ये राजन वेळूकर यांची नियुक्ती करण्यात आली होती. त्यावेळी नितीन देशपांडे आणि वसंत पाटील यांनी त्यांची निवड बेकायदेशीर असल्याची तक्रार केली होती. श्री.आदित्य ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली या सदनाचे सदस्य आणि विद्यमान आरोग्यमंत्री डॉ.दीपक सावंत यांनी या सभागृहात त्यांची निवड बेकायदेशीर असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आणली होती. शेवटी नितीन देशपांडे आणि वसंत पाटील यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. उच्च न्यायालयाने राजन वेळूकर यांची झालेली निवड ही आक्षेपार्ह बाब असल्यामुळे फेरविचार करावा असे आदेश दिले आहेत.

मा.उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांनी सांगितले की, सदरची बाब शासनाच्या अखत्यारीत येत नसून माननीय राज्यपालांना विनंती करावी लागेल. कुलगुरुंची फक्त 5 महिने सेवा शिल्लक असल्यामुळे मी मंत्री महोदयांना विनंती करतो की, तातडीने त्यांच्या अपात्रतेबद्दल योग्य ती कारवाई करण्यात यावी.

--------

..6..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, सभागृहातील अनेक माननीय सदस्यांनी सोलापूर विद्यापीठाला अहिल्याबाई होळकर यांचे नाव द्यावे अशी भावना व्यक्त केली आहे. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाला बहिणाबाई चौधरी यांचे नाव देण्याची मागणी माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी केली आहे. जीवनाचे तत्वज्ञान साध्या सोप्या भाषेत मांडणाऱ्या बहिणाबाई चौधरी यांनी म्हटले आहे की, अरे संसार संसार जसा तवा चुल्यावर, आधि हाताला चटके तेव्हा मिळते भाकर. मी शासनाला विनंती करतो की, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाला बहिणाबाई चौधरी यांचे नाव देणे हे औचित्याचे व महाराष्ट्राच्या दृष्टीने गौरवशाली ठरेल. सोलापूर विद्यापीठाला अहिल्याबाई होळकर यांचे नाव द्यावे. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांनी मंदिरे बांधली, मोगलांचे राज्य असताना देखील पर्वा न करता मशिदी बांधल्या, बुध्द विहार बांधले, अनेक तीर्थस्थळांचा विकास केला, त्यांचे नाव उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाला देण्यात यावे.

सभापती महोदय, गडचिरोली येथे गोंडवाना विद्यापीठ निर्माण केले आहे. त्या विद्यापीठाला क्रांतीकारी नेते बिरसा मुंडा यांचे नाव देण्याबाबत शासनाने विचार करावा. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री सकारात्मक विचार करणारे आहेत. पुणे विद्यापीठाला सावित्रीबाई फुले यांचे नाव देण्याची बाब त्यांनी सकारात्मक केली असल्यामुळे सोलापूर विद्यापीठाला अहिल्याबाई होळकर यांचे नाव, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाला बहिणाबाई चौधरी यांचे नाव आणि गोंडवाना विद्यापीठाला क्रांतीकारी नेते बिरसा मुंडा यांचे नाव देण्याबाबत सकारात्मक विचार करावा अशी विनंती करतो.

---------

...7....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.निरंजन डावखरे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, केंद्र शासनाने रोड ट्रान्सपोर्ट ॲंड सेफ्टी बिल, 2014 या नवीन कायद्यामधील भाग 7 मध्ये प्रवासी वाहतुकीच्या संदर्भात आमूलाग्र बदल सूचित केला आहे. त्यात खाजगी प्रवासी वाहतूक आणि एसटी सारखी सार्वजनिक वाहतूक यांची गणना एकसारखी केली आहे. त्यामुळे सर्व वैध व अवैध खाजगी वाहनांना प्रवासी वाहतुकीकरिता एसटी सारखे टप्पे घेण्याचे प्रस्तावित आहे. त्यामुळे एसटी महामंडळाचे अस्तित्व संपुष्टात येणार आहे. एसटी महामंडळ अनेक वर्षापासून प्रवासी जनतेला सुविधा देत आहे. त्या दृष्टीने सार्वजनिक उपक्रम आर्थिकदृष्टया बळकट करण्यासाठी काही तरतूद दिसून येत नाही. या कायद्यातील प्रस्तावित बदलाबाबत कामगार संघटनांनी केंद्र सरकारच्या संबंधित विभागास सूचना व हरकती लेखी स्वरुपात सादर केल्या आहेत. केंद्र सरकार या कायद्यास लवकरच मान्यता देणार असल्याचे कळते. कायद्यातील भाग 7 मधील प्रस्तावित बदलास संघटनांचा विरोध असल्यामुळे केंद्र शासनाच्या संबंधित विभागाकडून राज्य शासनाच्या मदतीने चर्चेसाठी बैठकीचे आयोजन होणे आवश्यक आहे अशी आमच्या सर्वांची अपेक्षा आहे. दिनांक 18 डिसेंबर, 2014 रोजी दिल्ली येथे विविध राज्यातून सार्वजनिक परिवहन उपक्रमातील कामगार येत असून त्यांचे शिष्टमंडळास ........

नंतर क्यू.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही